सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

## सन १८६४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २

## मुंबईच्या बाष्प जलयानांबाबत अधिनियम, १८६४

(दिनांक ६ ऑगस्ट २००५ पर्यंत सुधारित)

# Bombay Act No. II of 1864

# THE BOMBAY STEAM-VESSELS ACT, 1864

*(As modified upto the 6 th August 2005)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६

(किंमत : रु १.००)

# मुंबईचा बाष्प जलयानांबाबत अधिनियम, १८६४

अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे :

| | |
|---|---|
| १ ते १४ | (बाष्प जलयानांची पाहणी) सन १८८४ चा अधिनियम ६ द्वारे निरसित. |
| १५. | मुंबईच्या बंदरातून समुद्रात जाणाऱ्या बाष्प जलयानांना व्यापारी जहाज वाहतूक अधिनियम, १८५४ ची कलमे लागू करणे. |
| १६ आणि १७ | (अपराध्यांची) न्यायचौकशी करणे; शास्ती व फी वसूल करणे (अर्थउकल) |
| अनुसूची | 'क' व 'ख' [प्रमाणपत्राचा नमुना; फी] [१८८४ चा अधिनियम ६ द्वारे निरसित.] |

# सन १८६४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २[१]

[ मुंबईचा बाष्प जलयानांबाबत अधिनियम, १८६४ ][१]

[दिनांक ६ ऑगस्ट, २००५ पर्यंत सुधारलेला ]

[ २२ सप्टेंबर, १८६४ ]

हा अधिनियम सन १८८४ चा अधिनियम ६ या अधिनियमान्वये निरसित करण्यात आला आहे.
(कलम १५ खेरीज करून)

**मुंबई इलाख्याच्या बंदरांतील, (पोर्टस् व हारबर्स) नदींतील किंवा जल प्रांगणांतील बाष्प जलयानांची नियतकालिक पाहणी करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

उद्देशिका : (सन १८८४ चा अधिनियम ६ अन्वये निरसित करण्यात आली.)

१ ते १४ (बाष्प जलयानांची पाहणी). ही कलमे सन १८८४ चा अधिनियम ६ अन्वये निरसित करण्यात आली.

मुंबईच्या बंदरांतून समुद्रात जाणाऱ्या बाष्प जलयानांना व्यापारी जहाज-वाहतूक अधिनियम १८५४ ची कलमे लागू करणे.

१५. याद्वारे असे घोषित करण्यात येते की, व्यापारी जहाज वाहतूक अधिनियम (१७ व १८ Vict; Cap.104)[२] ची कलमे २९२, २९३ व २९४ व उक्त अधिनियमाची अनुसूची ' एस ' ही मुंबई इलाख्यांतील किंवा त्याचे अंमलाखालील प्रदेशांतून कोणतेही बंदर किंवा जागा यांमधून समुद्राकडे जाणाऱ्या सर्व बाष्प जलयानांना लागू असतील आणि उक्त कलम २९३ मध्ये नमूद केलेली शास्ति ठरविताना एक पौंड स्टर्लींग हे दहा रुपयांबरोबर आहे असे समजण्यात आले पाहिजे.

१६ आणि १७. [ अपराध्यांची न्यायचौकशी करणे ; शास्ति व फी वसूल करणे ; (अर्थउकल) ]

ही कलमे सन १८८४ चा अधिनियम क्र. ६ अन्वये निरसित करण्यात आली,

**अनुसूची ' क ' व ' ख '**

( प्रमाणपत्राचा नमुना ; फी. )

[ सन १८८४ चा अधिनियम ६क अन्वये निरसित करण्यात आली ]

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १८६३, पुरवणी, पृ. ३८३; प्रवर समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्राचे पृ. ३९६; आणि विधानसभेतील कामकाजाकरिता वरील राजपत्राचे पृ. ४०६, ४२२, ४८३; आणि मुंबई शासन राजपत्र, १८६४ पृ. २२६ पहा.

मुंबई संक्षिप्त नाव अधिनियम, १९२१ (१९२१ चा मुंबई २) द्वारे संक्षिप्त नाव देण्यात आले.

[२] आता पहा व्यापारी जहाज वाहतूक अधिनियम, १८९४ (५७ व ५८ Vict., Cap. 60) भारताशी संबंधित संविधि संग्रह, दुसरी आवृत्ती.

---

शासकीय मुद्रणालय, नागपूर.